CR200801021З

334

२७

<u>वाचा-</u> १. महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ यांचेकडील पत्र क्र. वक्फ ३९/२००६/सं.क्र.३७/ल-३ मुंबई दिनांक- २५/९/२००६.
२. महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ क्रमांक वक्फ १०/२००७/ प्र.क्र.२००/ल-३ दिनांक-१३/११/२००७.

---

क्रमांक/ना.भू./वक्फ मि.नोंदी आ./२००७
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख(म.राज्य)पुणे यांचे कार्यालय
नवीन प्रशासकीय इमारत दुसरा मजला,
विधानभवन समोर पुणे- ४११ ००१
पुणे दिनांक- २/१/२००८

<u>परिपत्रक</u>

विषय :- <u>वक्फ मिळकतीचे रेकॉर्ड दुरूस्ती करून घेणेबाबत.</u>

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये भूमापन झालेल्या क्षेत्रातील अधिकार अभिलेखाची फेरफार नोंदीबाबत वक्फ मिळकतीचे रेकॉर्ड दुरूस्ती करणेबाबत खालीलप्रमाणे सूचना देणेत येत आहेत.

वक्फ अधिनियम १९९५ मध्ये कलम ५६ नुसार मंडळाच्या परवानगीशिवाय वक्फ मालमत्ता भाडेपट्टयाने देवू नयेत. ७/१२ व मिळकत पत्रिकेवर नोंद घेताना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांना नोटीस देणे अनिवार्य आहे. सदर अर्धन्यायीक बाब सर्व्हे अधिकारी यांचे नजरेस आणून देण्यात यावी. असे शासनाने सुचित केले आहे.

(१) वक्फ मालमत्तांच्या अनियमित हस्तांतरण थांबविणेच्या दृष्टीने असे प्रस्तावित करणेत आले आहे की, मालमत्ता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे नोंदणीकृत झालेनंतर सदर नोंदीबाबतच्या "<u>अ</u>" पत्रकाची प्रत माहितीस्तव संबंधित जिल्हाधिकारी यांना पाठविणेत यावी. ही बाब महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे नियमांतर्गत सक्तीचे आहे. याकडे लक्ष वेधणेत येत आहे. त्यामध्ये असे नमूद करणेत यावे की, सदर मालमत्तेच्या हस्तांतरणाचा प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांचेकडून संबंधीतांना ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणेची अट घालणेत यावी. हस्तांतरणाच्या यापूर्वी झालेल्या प्रकरणामध्ये वक्फ मंडळास अनियमित हस्तांतरण झाल्याबाबत साशंकता असल्यास अशा प्रकरणांची यादी तयार करून वक्फ मंडळाने ती पुढील कार्यवाही करीता शासनास सादर करावी.

(२) महसूल अभिलेखात वक्फ मालमत्तांच्या नोंदी अद्यावत करणेबाबत मिळकत पत्रिकेवर मुतवल्ली किंवा इनामदारांचे नाव न नोंदविता वक्फ मालमत्तेची नोंद करणे आवश्यक आहे. अशी नोंद करताना ती इतर हक्कात करणेत यावी. याबाबत "शासन तसेच वक्फ मंडळ यांचे हस्तांतरणास परवानगी घ्यावी" असा शेरा नमूद करावा. ज्या प्रकरणामध्ये यापूर्वी मुतवल्ली किंवा इनामदारांची नांवे नोंदविण्यात आली आहेत. त्या वक्फ मालमत्तांची यादी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी शासनास सादर करावी व त्याप्रकरणामध्ये वक्फ मालमत्तांची नांवे नोंदविणेबाबत संबंधीत जिल्हाधिका-यांनी आवश्यक ती कार्यवाही करणेची आहे.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे व तातडीने सुरू करावयाची आहे.

**स्वाक्षरी/-(डॉ.शैलेशकुमार शर्मा)**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे**

**प्रतः-** मा.विभागीय आयुक्त (सर्व)/ जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**प्रतः-** उपसंचालक भूमि अभिलेख(सर्व)यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**प्रतः-** अधीक्षक भूमि अभिलेख(सर्व)/ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख(सर्व)/नगर भूमापन अधिकारी(सर्व)यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

**प्रत-** कार्यालय अधीक्षक, आ-१/ आ-२/ आ-३/ आ-४/ आ-५/ ले-१/ ले-२/ ले-३/ भू-१/ भू-२/ भू-३/भू-४/ भू-५/ ना.भू.१/ ना.भू.२/ ना.भू.३/ना.भू.४/एकत्री-१ ते ३./ स-१ यांना माहितीसाठी रवाना.

**"नि र्ग मि त"**

२१/१/२००६

**(संभाजी शिंदे)**
**उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न**
**जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन)पुणे**